# थेट मुलाखती (walk-in-interview) करीता कंत्राटी पदभरती - 2023-24
## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM), अमरावती महानगरपालिका अमरावती

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM ) अमरावती महानगरपालिका अंतर्गत कंत्राटी पुर्णवेळ वैद्यकिय अधिकारी (Full Time Medical Officer) & कंत्राटी अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी (Part Time Medical Officer) व राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM ), 15 वा वित्त आयोगा अंतर्गत कंत्राटी वैद्यकिय अधिकारी (Medical Officer) यांची थेट मुलाखतीव्दारे (walk-in-interview) पदभरती करावयाची आहे.

**थेट मुलाखती करीता सोबत अर्ज सादर करण्याची पध्दत :-**

1) जाहिरात ऑनलाईन व वृत्तपत्रातुन प्रसिध्द केले जाईल.
2) तसेच अमरावतीचे वेबसाईट www.amravaticorporation.in वर जाहिरात उपलब्ध राहील.
3)जाहिरातीच्या दिनांकापासुन दि.31/10/23.. रोजी सकाळी ..11:00.....वा. मा.आयुक्त यांच्या दालनात उमेदवारांचे मुलाखत walk-in-interview ठेवण्यात येतील. तरी उमेदवारांनी आपली सर्व शैक्षणिक कागदपत्रे (एक original set व एक Xerox set self attested करून) हजर रहावे. **खालील नमुद सर्व पदांकरीता प्रत्येक मंगळवारी walk-in-interview ठेवण्यात येतील.**

उमेदवारांनी वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सर्व सुचना, गुणवत्ता यादी अमरावती महानगरपालिका वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील.

**NUHM अंतर्गत कंत्राटी Full Time Medical Officer & Part Time Medical Officer रिक्त पदांची जाहिरात**

| अ. क्र. | पदाचे नाव | एकुण रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | वय मर्यादा | शैक्षणीक अर्हता | प्रवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Full Time Medical Officer (कंत्राटी) | 4 | अमरावती महानगरपालिका | खुला प्रवर्गासाठी – 38 वर्ष<br>राखीव प्रवर्गाकरीता – 43 वर्ष<br>(NHM कर्मचारी 5 वर्ष शिथिल) | M.B.B.S. | विजा-अ(VJ-A) -1<br>भज-क(NT-C) - 1<br>आदुघ (EWS) – 1<br>अजा (SC) – 1 | 60000/- |
| 2 | Part Time Medical Officer (कंत्राटी) | 11 | अमरावती महानगरपालिका | खुला प्रवर्गासाठी – 38 वर्ष<br>राखीव प्रवर्गाकरीता – 43 वर्ष<br>(NHM कर्मचारी 5 वर्ष शिथिल) | M.B.B.S. | अराखीव -11 | 30000/- |
| | | | | | | एकुण भरावयाची पदे 15 | |

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM ) 15th वित्त आयोगा अंतर्गत कंत्राटी Medical Officer रिक्त पदांची जाहिरात**

| अ. क्र. | पदाचे नाव | एकुण रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | वय मर्यादा | शैक्षणीक अर्हता | प्रवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (कंत्राटी) | 24 | अमरावती महानगरपालिका | खुला प्रवर्गासाठी – 38 वर्ष<br>राखीव प्रवर्गाकरीता – 43 वर्ष<br>(NHM कर्मचारी 5 वर्ष शिथिल) | M.B.B.S. | अजा (SC) – 2<br>अज (ST) – 2<br>विजा-अ(VJ-A) -1<br>भज-ब(NT-B) – 1<br>इमाव (OBC) - 5<br>भज-क(NT-C) - 1<br>आदुघ (EWS) – 3<br>भज-ड(NT-D) – 1<br>खुला (Open) – 8 | 60000/- |
| | | | | | | एकूण भरावयाची पदे 24 | |

Scanned by CamScanner

अटी व शर्ती –(कंत्राटी पदाकरीता – Full Time Mo & Part Time MO तसेच 15th FC MO)

1) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरूपाची असून NUHM च्या मार्गदर्शक सुचनेनुसार नियुक्ती देण्यात येईल.

2) जाहिरातातील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरूपातील पद आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

3) अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा, व अर्जदार विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झाला नसावा.

4) उपरोक्त कंत्राटी पदाकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

5) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व नियुक्ती ठिकाणात बदल होऊ शकतो याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा अध्यक्ष महानगरपालिका अमरावती यांनी राखून ठेवले आहे. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.

6) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

7) एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

8) निवड प्रक्रियेतील पात्र / अपात्र उमेदवारांची यादी, भरती प्रक्रियेची माहिती अमरावती महानगरपालिकेच्या वेबसाइटवर www.amravaticorporation.in प्रसिध्द करणेत येईल, याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

9) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

10) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा अराखिव प्रवर्गासाठी 38 वर्षे व राखीव प्रवर्गासाठी 43 वर्षे राहील. तसेच एनएचएम अंतर्गत काम केलेल्या अथवा करीत असलेल्या उमेदवारांना 5 वर्षे वयोमर्यादा शिथिल राहील.

11) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही गुणानुक्रमे (Merit List नुसार) यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

12) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

13) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील, अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविणेत येईल.

14) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा अध्यक्ष महानगरपालिका अमरावती यांचे स्तरावर राखिव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

15) आरोग्य विभागाअंतर्गत NUHM अंतर्गत सदर निवड प्रक्रियेमध्ये त्याच संवर्गातील पदे रिक्त राहील्यास प्रतिक्षा यादीतुन उमेदवार घेण्यात येतील.

16) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. सदर अंतिम निवड यादी ही तयार झालेनंतर वेबसाईटवर प्रसिध्द झालेनंतर पुढील एक वर्षापर्यंत वैध राहील.

Scanned by CamScanner

17) मागास वर्गीय संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या पदावर इतर संवर्गातील उमेदवाराची तात्पुरत्या स्वरूपात निवड करण्यात येईल.

18) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

19) ज्या उमेदवारांची निवड करण्यात येईल. त्यांनी नुकतेच काढलेले पासपोर्ट साईज कलर फोटो, जन्म तारखेचा दाखला, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र व मार्कशीट, (शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका आवश्यक), एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, अधिवास व राष्ट्रीय प्रमाणपत्र, महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल नोंदणी/नूतनीकरण प्रमाणपत्र (वैद्यकिय अधिकारी पदासाठी), इतर कागदपत्रे यांच्या मुळ व सत्य प्रत साक्षांकित प्रतीसह सोबत ठेवावे.

20) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. सदर अंतिम निवड यादी ही तयार झालेनंतर वेबसाईटवर प्रसिध्द झालेनंतर पुढील एक वर्षापर्यंत वैध राहील.

21) थेट मुलाखती दरम्यान राखीव प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. कंत्राटी स्वरुपाची पदे असल्याने जात वैद्यता प्रमाणपत्रांची (Caste Validity) आवश्यकता नाही. तरी उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.

22) थेट मुलाखती दरम्यान उमेदवारांकडून अर्धवट, अपूर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केले गेला असल्याने, संबंधित उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास, अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वीपणे संपूर्ण जवाबदारी संबंधित उमेदवारांची राहिल याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरूपाची तक्रार स्विकारली जाणार नाही.

23) पात्र व अपात्र उमेदवारांची यादी महानगरपालिकेच्या सुचना फलकावर लावण्यात येईल. सदरची यादी पाहण्याची जबाबदारी हि उमेदरावांची राहील. व्यक्तीशः या कार्यालयाकडून कोणालाही माहीती देण्यात येणार नाही.

24) उपरोक्त पदे ही राज्य शासनाची नियमित पदे नसुन, निव्वळ कंत्राटी स्वरूपातील पदे आहे. सदर पदावर कायम पदाचा हक्क राहणार नाही, तसेच या पदासाठी शासनाचे नियम लागू नाही. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्या संबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. तसेच नियुक्तीच्या कालावधीमध्ये उमेदवारांचे काम समाधानकारक न आढळल्यास तसेच कोणतेही प्रकारची गैरवर्तणुक केल्यास व शासकीय कामात अथडळा आणल्यास कोणतेही सुचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

25) उच्च शैक्षणिक अर्हताधारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

26) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

27)या पदाकरीता अर्जदाराने A4 आकाराच्या कागदावर सोबत जोडलेल्या विहित नमुण्यातच अर्ज करावा. उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका, जातीचा दाखला / जात वैधता

Scanned by CamScanner

प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा / जन्मतारखेचा दाखला, प्रमाणित केलेले कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत केलेली प्रत व पडताळणीकरीता मुळ कागदपत्रे वेळेवर उपलब्ध् करणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

28)अर्जासोबत सादर केलेल्या छायांकीत प्रत व मुळ दस्ताऐवज यांचेमध्ये तफावत आढळल्यास अथवा माहिती खोटी आढळल्यास उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

29)राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत कर्मचा-यांना सदर पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास त्या कर्मचा-यांनी आपल्या कार्यालय प्रमुखाची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील व तसे परवानगी पत्र सदर अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील, तसे परवानगी पत्र नसल्यास व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर अर्जदाराचा अर्ज अपात्र करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

30)<u>वयोमर्यादा</u> - i) उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहीत वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

ii) वय 18 पेक्षा कमी नसावे.

iii) अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय 38 पेक्षा जास्त् नसावे व राखीव प्रवर्गातील उमेदवाराचे वय 43 पेक्षा जास्त नसावे.

iv) सेवा निवृत्त कर्मचा-यांसाठी विशेष तज्ञ, एम.बी.बी.एस. वैद्यकिय अधिकारी या पदाची वयोमर्यादा 70 वर्ष राहील.

v)उमेदवारास 2 किंवा त्यापेक्षा कमी अपत्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. 2 पेक्षा जास्त अपत्य असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. तसे जाहिरातीमध्ये जोडण्यात आलेले प्रतिज्ञापण नमुना अ आपल्या स्वाक्षरीने जोडण्यात यावे.

31)खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात.

32) 1)शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
2)राखीव उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र
3)शाळा सोडल्याचा जन्म तारखेचा दाखला
4)प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे
5)पासपोर्ट आकाराचा फोटो
6)शासकीय अनुभव असल्यास अनुभव दाखला
7)लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र
8)नावात बदल असल्यास गॅजेट (राजपत्र) जोडणे

33)<u>निवड प्रक्रिया -</u>

पात्र उमेदवारांमधून निवड प्रक्रिया खालील प्रमाणे राबविण्यात येईल. (दि.27/04/2023 मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या पदभरती बाबत प्राप्त ई-मेल व्दारे निर्गमित मार्गदर्शक सुचनेनुसार)

1) <u>थेट मुलाखती</u> :- अधिकारी (MBBS) हि पदे थेट मुलाखती घेवून भरण्याकरीता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

1)Subject knowledge (10)
2)Research & Academic Knowledge (10)
3)Leadership Quality (10)
4)Administrative Abilities (10)
5)Experience (10)
a) For Govt.Experience – 2marks for one year
b) For Private Experience – 1 marks of one year
Total Experience – 10 marks maximum.

**एकूण गुण – 50**

Scanned by CamScanner

अ) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल.

आ) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवारांचे गुणांकन(Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

इ) एकूण पदांच्या 50% प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी
महानगरपालिका अमरावती

आयुक्त
महानगरपालिका अमरावती

Scanned by CamScanner